**जा.क्र.कृपमं/व्हीएचटी/ऑनलाईन/ /२०१७** **वाशी, दि. .०३.२०१७**

**परिपत्रक**

**विषय – व्ही.एच.टी. सुविधा केंद्र आरक्षणाबाबत...**

सर्व आंबा निर्यातदार /व्यापारी यांना कळविणेत येते कि,महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत व्ही.एच.टी. सुविधा केंद्र येथे आंबा प्रक्रियेसाठी आगावू आरक्षण (Booking) करण्यासाठी ऑनलाईन पध्दत विकसीत करण्यात आलेली आहे.ऑनलाईन पध्दतीत खालील प्रमाणे आरक्षण स्विकारण्यात येईल.

१. प्रत्येक आठवडयाचे आगावू आरक्षण हे अगोदरच्या आठवडयातील बुधवार पासून उपलब्ध असेल.
२. दररोज दोन बॅच मध्ये प्रक्रिया करणेत येईल. प्रत्येक बॅचमध्ये ५०० किलोचे ३ स्लॉट असतील असे प्रतिदिन ६ स्लॉट प्रक्रियेसाठी उपलब्ध असतील.
३. आगावू आरक्षणासाठीचे प्रक्रिया शुल्काची संपुर्ण रक्कमही बुकिंग करतेवेळी ऑनलाईन पेमेंट गेटवेमधुन भरणा करावी पेमेंट झाले नंतरच स्लॉट बुकिंग होईल.
४. स्लॉटचे आरक्षण हे दररोज सकाळी १० ते ६ वा. पर्यंत उपलब्ध राहील.
५. एका निर्यातदारास प्रतीदिन १ (एकच ५००किलो ) स्लॉट बुक करता येईल.जर एखादया विशिष्ट दिवसाचे सर्व स्लॉट बुक झाले नसतील तर त्या विशिष्ट दिवसासाठी (३६तास अगोदर) निर्यातदारांना एका पेक्षा जास्त स्लॉट बुक करण्याची संधी देण्यात येईल.
६. एका लॉटमध्ये अधिकतम १५०० किलोग्रॅम आंब्यावर प्रक्रिया करणेत येईल.
७. एकदा आरक्षण केल्यानंतर ते रद्द करावयाचे झाले तर ते ३६ तास अगोदर करता येईल. अशा वेळी स्लॉट कॅन्सलेशन चार्जेस हे स्लॉटसाठी भरणा केलेल्या रक्कमेतील २५ टक्के रक्कम दंड म्हणून कापून घेतली जाईल आणि उर्वरीत रक्कम परत केली जाईल.
८. एखाद्या निर्यातदारांनी बुक केलेला स्लॉट ३६ तास अगोदर रद्द न केल्यास किंवा प्रक्रियासाठी आंबा न आणल्यास त्या स्लॉटसाठी भरणा करण्यात आलेली सर्व रक्कम (१०० टक्के) दंड म्हणून कपात करण्यात येईल.
९. जपान व न्युझीलंड आंबा निर्यातीसाठी पुर्ण एक बॅच-१५०० किलोचे किंवा ५०० किलोचे पटीत आगावू आरक्षण करता येईल. सदरील आरक्षण हे आरक्षणाच्या दोन आठवडे अगोदर बुधवार पासून करता येईल.
१०. जपान किंवा न्युझीलंड आंबा निर्यातीसाठी बॅचचे आरक्षण करून सर्व प्रक्रिया केलेला माल हा इतर देशास पाठवता येणार नाही, असे केलेले निदर्शनास आले तर सदर निर्यातदारास आरक्षण पध्दतीतून १५ दिवसासाठी बाद करण्यात येईल.
११. स्लॉट बुकिंग ज्या निर्यात कंपनीचे नांवे घेतलेली आहे. त्याच कंपनीचे नांवे निर्यात करावी लागेल.असे न केलेले निदर्शनास आले तर सदर निर्यातदारास आरक्षण पध्दतीतून १५ दिवसासाठी बाद करण्यात येईल.

१२. आंबा प्रक्रियेसाठी प्रत्येक दिवशी पहिल्या बॅचमधील सर्व स्लॉटचा माल सकाळी- ६.०० वाजेपर्यंत व दुस-या बॅचमधील सर्व स्लॉटचा माल सकाळी -१०.०० वाजेपर्यंत सुविधा केंद्रावर पोहोचेल याची काळजी घ्यावी. त्यासोबत सेन्सरसाठी लागणारी तीन कच्ची फळे अतिरिक्त आणणे बंधनकारक आहे.

१३. अपेडा व एन.पी.पी.ओ. यांनी वेळोवेळी देशनिहाय निर्यातीसाठी निर्देशित केलेले निकष अथवा मार्गदर्शक तत्वांचे तसेच SOP चे पालन करणे बंधनकारक आहे. तसे न केल्यास निर्यातदारांनी बुक केलेला स्लॉट रद्द करण्यात येईल व त्या स्लॉटसाठी भरणा करण्यात आलेली सर्व रक्कम (१०० टक्के) दंड म्हणून कपात करण्यात येईल.

१४. अपेडा व एन.पी.पी.ओ. यांनी फळे व भाजीपाला निर्यातीसाठी ठरवुन दिलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार प्रक्रियेकरीता येणारा सर्व आंबा मॅगोनेट मधे नोंदणीकृत शेतकऱ्यांचाच असणे क्रमप्राप्त आहे. अशा प्रकारचा माल नसल्यास प्रक्रियेसाठी स्विकारल्या जाणार नाही व संबंधीत निर्यातदाराची स्लॉटसाठी भरणा करण्यात आलेली सर्व रक्कम (१०० टक्के) रक्कम दंड म्हणून कपात करण्यात येईल.

१५. काही तांत्रिक कारणास्तव किंवा एन.पी.पी.ओ.अधिका-यामार्फत प्रायमरी इनपेक्शन न झाल्यामुळे प्रक्रिया होऊ न शकल्यास संबंधित निर्यातदारांची स्टॉलसाठी भरणा करण्यात आलेली सर्व रक्कम परत करण्यात येईल. अथवा नव्याने स्लॉट देण्यात येईल.

१६. एन.पी.ओ.चे अधिकारी यांनी प्रायमरी इन्सपेक्शनमध्ये आंबा रिजेक्ट केल्यास तो स्लॉट रद्द समजून प्रक्रिया सुरूवात करण्यात येईल व अशाप्रकारे स्लॉट रद्द झाल्यास त्या स्लॉटसाठी भरणा करण्यात आलेली सर्व रक्कम (१०० टक्के) दंड म्हणून कपात करण्यात येईल.

१७. वर्ष २०१७-१८ साठी मागील वर्षाप्रमाणे प्रक्रिया शुल्क प्रति बॅच रु. २०,०००/- (१.५ मेट्रीक किंवा त्याहून कमी) असेल.

**आपला विश्वासू,**

**कार्यकारी संचालक**
महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ

प्रत,

१. सर्व संबंधित निर्यातदार / व्यापारी